www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

**Lang. Code : 11**

इस पुस्तिका में **20** पृष्ठ हैं ।
This booklet contains **20** pages.

# TAJ 19-II

**प्रश्न-पत्र II / PAPER II**
**मराठी भाषा परिशिष्ट**
**Marathi Language Supplement**
**भाग IV & V / PART IV & V**

परीक्षा पुस्तिका संकेत
**Test Booklet Code**

**W**

परीक्षा पुस्तिका संख्या
**Test Booklet No.**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए ।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20)पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें ।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें । / For instructions in Marathi see Page 2 of this Booklet.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं** ।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से ।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं । भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं ।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें ।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **W** । यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है । अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं । इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं । **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए । जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए ।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो ।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें ।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें । अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें । उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है ।

## *INSTRUCTIONS FOR CANDIDATES*

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page / marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **W**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part -V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capitals) :
अनुक्रमांक : (अंकों में) ____________________
Roll Number : in figures
: (शब्दों में) ____________________
: in words
परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capitals) :
परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________ निरीक्षक के हस्ताक्षर : ____________
Candidate's Signature : Invigilator's Signature :
Facsimile signature stamp of
Centre Superintendent ____________________

W

www.prepp.in



**Lang. Code : 11**

ही पुस्तिका 20 प्रष्ठ आहे.

# TAJ 19-II

**प्रश्नपत्रिका II**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**W**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील (19 आणि 20) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थीसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड W** आहे. उत्तर पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   **भाग IV : भाषा – I (मराठी)** *(प्र. 91 ते 120)*

   **भाग V : भाषा – II (मराठी)** *(प्र. 121 ते 150)*
7. भाग IV मध्ये भाषा I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग V मध्ये भाषा II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा I व/वा भाषा II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग V (भाषा II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ______________________

: शब्दांमध्ये : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of

Centre Superintendent ______________________

www.prepp.in



परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120),** if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

www.prepp.in



## भाग – IV
## भाषा – I
## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **(प्रश्न क्र. 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

**पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

माणूस आणि पाषाण यांचा संबंध अगदी आदिमकाळापासून दृढ झाला आहे. शिवाय हा संबंध केवळ वरवरचा नाही. तात्पुरता नाही. या संबंधाला मैत्रीची ऊब आहे. सहकार्याचा ओलावा आहे. कृतज्ञतेचा गंध आहे. त्यामुळे आदिमानवाने पहिली मैत्री केली, ती या पाषाणाशीच ! त्या काळात पाषाण हा माणसाचा आधार बनला. संरक्षक झाला. अन्नदाताही झाला. म्हणून तो या आदिम मानवाने आपल्या काळजाशी घट्ट धरून ठेवला. काळजासारखा जपला. दोहोंमधला हा ऊबदार व ओलसर स्नेह आजपर्यंत टिकून आहे. लोकजीवनामध्ये तर तो अधिकच मधुर झालेला जाणवतो.

भूक, वणवा, पाऊस आणि वादळवारे यांच्यापासून संरक्षण व्हावे, यासाठी शिकारीवर जगणाऱ्या या प्राचीन मानवाने प्रथम आश्रय घेतला तो पाषाणाच्या गुहेचाच. पाषाण हा असा मानवाच्या अंत:करणात घुसला आणि कायमचाच मित्र बनला. मग शिकार करण्यासाठी या मानवाला या पाषाणाचीच पूजा करावी लागली. पाषाणाची हत्यारे घेऊनच त्याने प्राण्यांचा पाठलाग केला. जखमी व अशक्त जनावरांना या दगडानेच जखमी केले. खळाळत्या पाण्याच्या तळाला पाषाणाला पडलेला खळगा या आदिमानवाने कधीतरी एकदा पाहिला असावा आणि त्यात साचलेल्या पाण्यावर त्याने आपली जन्माची तहान भागविली असावी. म्हणजे अन्नाबरोबर या पाषाणाने मानवाच्या तृष्णेचाही प्रश्न <u>सोडविला</u>. निवारा तर त्याला आधीच गुहेने दिलेला होता. कच्चे मांस खात असताना वणव्यात सापडून मेलेल्या प्राण्याचे भाजलेले मांस या आदिमानवाने कुतूहल म्हणून चाखले असावे. ते कमालीचे रुचकर व खमंग लागल्यावर त्याला झालेला आनंद आभाळभर पसरला. अन् ..... तेव्हापासून मग या मानवाने तीन दगडांची चूल करून कच्चे मांस भाजून खाण्याला प्रारंभ केला असावा. म्हणजे पुन्हा चुलीच्या रूपाने पाषाणाचा रुचकर हात माणसाच्या पाठीवर मायेने फिरलाच. दगड-मातीची चूल आजही लोकजीवनाला अन्नब्रह्माचा पौष्टिक प्रसाद देते हे आपण पाहतोच. लोकसंस्कृतीचा अविभाज्य घटक असलेले आदिवासी आणि फिरस्ते गावाजवळच्या माळावर उतरल्यावर आधी तीन दगडांची चूल तयार करूनच मग आपल्या पालामध्ये विसावतात.

या आदिमानवाने पशुपालन आणि शेती करायला प्रारंभ केला, तेव्हाही या पाषाणाची साथ आणि संगत सुटली नाही. उलट ती अधिकच दृढ झाली. आजही लोकजीवनातला शेतकरी आणि बलुतेदार यांना या पाषाणाला पदोपदी शरण जावे लागते. मातीवर मनापासून

www.prepp.in



प्रेम करणारा हा भूमिपुत्र पाषाणावर तितकेच उत्कट प्रेम करतो. शेतामध्ये बांध घालायचा असो, अथवा फुटलेल्या बांधाचे तोंड बुजवायचे असो, त्याला हा दगड सोन्याहून अधिक मोलाचा वाटतो. घरे अथवा गोठा बांधायचा असो, नदीच्या काठावर पायऱ्या बांधायच्या असोत, देवळाचे शिखर आभाळाला भिडवायचे असो वा देऊळच निर्माण करायचे असो, या बांधकामास उपयुक्त पडणाऱ्या दगडाशिवाय लोकसंस्कृतीला दुसरा आधारच नसतो. या काळ्या पाषाणातूनच मग लोकजीवनातले पाथरवट आणि वडार-गवंडी फडी तयार करतील, चिरा तयार करतील. लाकडी खांबाच्या तळाशी ठेवायला चौकोनी दगड करतील. लोकसंस्कृतीने पायरीपासून परमेश्वरापर्यंत या पाषाणाची मदत घेतली आहे.

**91. शेतकरी आणि बलुतेदारांना वेळोवेळी कोणाच्या शरणी जावे लागते ?**

(1) बांधाच्या

(2) वृक्षाच्या

(3) पाषाणाच्या

(4) चुलीच्या

**92. माणूस आणि पाषाण यांचा सहसंबंध स्पष्ट करताना लेखकाने कोणते विशेषण वापरले नाही ?**

(1) ऊब

(2) ओलावा

(3) गंध

(4) वणवा

**93. 'निवारा' शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.**

(1) निर्वासन

(2) निवाडा

(3) आश्रय

(4) विश्रुत

**94. शेतकऱ्यांना दगड कोणत्या गोष्टीपेक्षा अधिक मूल्यवान वाटतो ?**

(1) पाषाण

(2) सोनं

(3) दागिना

(4) मोहक शिल्प

**95. लोकजीवनाला आजपर्यंत कोणत्या गोष्टीचा प्रसाद सातत्याने मिळत आहे ?**

(1) देवळाच्या शिखराचा

(2) परमेश्वराचा

(3) शेतातील बांधाचा

(4) अन्न ब्रह्माचा

www.prepp.in



**96. लोकसंस्कृतीने पाषाणाचे कोणत्या पातळीवर सहकार्य घेतले, असे लेखकाला वाटते ?**

(1) पाऊस आणि वादळवारा

(2) पायरी ते परमेश्वर

(3) मळ्यापासून चुलीपर्यंत

(4) वादळवारा ते पाऊस

**97. माणूस आणि पाषाण यांच्या बाबतीतली कोणती बाब आजपर्यंत टिकून आहे ?**

(1) परस्पराश्रितता

(2) ऊब

(3) स्नेह

(4) ऊब व ओलसर स्नेह

**98. 'विसावणे' या शब्दाचा आशय व्यक्त करणारा पर्याय शोधा.**

(1) विस्तारित होणे

(2) विस्थापित होणे

(3) विश्रांती होणे

(4) विस्मित होणे

**99. आदिम मानवाने प्रथमत: आपली तहान कशी भागवली ?**

(1) पाषाणातून

(2) खळग्यातून

(3) नदीतून

(4) विहीरीतून

**पुढील पद्यांश वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 यासाठी योग्य पर्यायाची निवड करा.**

एक माझा मित्र आहे अगदीच साधाभोळा
भोळेपणीं पण त्याच्या कळा ओसंडती सोळा;
माणसांशी बोलतांना शब्दाशब्दाशी गोंधळे
पण मातीशी बोलतां त्याचा दिवस मावळे;
त्याच्या हातीं वळून ती कधी फूल कधी वेल
नेम नाही रसश्री ही कुण्या चित्रें पालवेल;
सारीं धरित्रीचीं स्वप्नें त्याच्या हातून बोलती,
भूतभविष्याचीं दारें साध्या स्पर्शाने खोलती;
असा मातीचा हा राजा जगांत या परदेशी,
हाटीं भेटलेला ठग जातो पाडून त्या फशीं;
तरी माझा मित्र भोळा त्याचें कौतुक सांगतो,
त्रस्त होतां मातीच्याच पण कानाशी लागतो;
त्याच मातीच्या वराने त्याला नाही कांही कमी,
त्याच्या हातीं तिचें स्वप्न नवें उमले नेहमी.

**100. कवीचा मित्र आपली गाऱ्हाणी कोणाला सांगतो ?**

(1) ढगाला

(2) वाऱ्याला

(3) जमिनीला

(4) देवाला

**101. प्रस्तुत कवितेत कवीने कोणाची थोरवी गायली आहे ?**

(1) शेतकऱ्याची

(2) शब्दकळांची

(3) भूतभविष्याची

(4) स्पर्शाची

www.prepp.in



102. 'ओसंडणे' या शब्दातून कोणता अर्थबोध होतो ?

(1) कोलमडून पडणे

(2) अवखळणे

(3) थरारुन जाणे

(4) भरुन वाहून जाणे

103. 'मावळे' या शब्दातून कवीला काय सुचवायचे आहे ?

(1) आरंभ

(2) शिवाजीचे सैनिक

(3) शेवट

(4) उगवणे

104. कवीच्या मते जमिनीच्या आशा आकांक्षा कोणत्या माध्यमातून व्यक्त होतात ?

(1) धरित्रीतून

(2) शेतकऱ्याच्या हातून

(3) मातीच्या वरातून

(4) शब्दकळांतून

105. 'मातीचा राजा' ही संज्ञा कवीने कोणासाठी वापरली आहे ?

(1) मित्र

(2) ढग

(3) धरित्री

(4) शेतकरी

(योग्य पर्याय निवडून प्र.क्र. 106 ते 120 यांची उत्तरे द्या)

106. कविता शिकवताना पुढीलपैकी कोणती बाब सर्वात महत्त्वाची ठरते ?

(1) प्रत्येक कवितेचा एक निश्चित अर्थ असतो.

(2) कवितेचे एकापेक्षा अधिक अर्थ असतात.

(3) कविता सामाजिक मुद्दांवर व्यक्त होत नसते.

(4) कविता भावनात्मक मुद्दांवर भाष्य करीत नसते.

107. अहवाल लेखन शिकवताना शिक्षिका मुलांना वर्तमानपत्रातील बातम्यांची कात्रणे पुरवते. शिक्षिका मुलांना बातम्या वाचून त्या संबंधी त्यांन्ची निरीक्षणे लिहायला सांगते. वर्तमानपत्राची ही कात्रणे म्हणजे....

(1) अध्यापन सामग्री

(2) अध्ययन सामग्री

(3) अध्ययन-अध्यापन सामग्री

(4) अध्यापन पद्धती आणि धोरण

108. भारतात किती भाषाकुल मानले गेले आहेत ?

(1) चार (2) सहा

(3) आठ (4) दहा

109. पुढीलपैकी कोणत्या पद्धतीत मातृभाषेचा भाषावर्गात वापर केला जात नाही ?

(1) थेट पद्धती (Direct Method)

(2) भाषा-श्राव्य पद्धती (Audiolingual Method)

(3) विसर्जन पद्धती (Immersion Method)

(4) नैसर्गिक पद्धती (Natural Method)

www.prepp.in



**110.** भाषा शिकवत असताना शिक्षिका विज्ञान आणि समाजशास्त्रातील उदाहरणे देते. असे करण्याला काय म्हणता येईल ?

(1) विज्ञान आणि भाषा शिक्षण

(2) भाषेचे अभ्यासक्रमापलिकडे शिक्षण

(3) टी.पी.आर. पद्धती

(4) सी.एल.टी. पद्धती

**111.** भाषा शिक्षणातील ज्ञानात्मक दृष्टिकोन पुढीलपैकी कोणत्या गोष्टीवर भर देतो ?

(1) चुकणे हा भाषा अध्ययन प्रक्रियेचाच भाग आहे.

(2) एखाद्या गोष्टीची सवय लावणे, यातून भाषा अध्ययनात मदत होते.

(3) संवादांना पाठ करणे व त्यांचे पुनरुच्चारण करणे यावर शिक्षकांनी भर दिला पाहिजे.

(4) चुकांना शक्यतो लवकर सुधारुन घेतल्या पाहिजेत नाही तर त्या विद्यार्थ्यांच्या डोक्यात घर करतात.

**112.** विद्यार्थ्यांची कामगिरी समाधानकारक नसल्यामुळे तिच्या पाहणीसाठी शिक्षक एक चाचणी तयार करतात. ते पुढीलपैकी कोणत्या पद्धतीचा आधार घेतात ?

(1) कौशल्य चाचणी (Proficiency Test)

(2) उपचारात्मक चाचणी (Diagnostic Test)

(3) कामगिरीची चाचणी (Achievement Test)

(4) समग्र चाचणी (Summative Test)

**113.** सहाव्या इयत्तेची भाषा शिक्षिका विद्यार्थ्यांच्या भाषाविषयक उत्तरपुस्तिका तपासते. विद्यार्थ्यांची कामगिरी समाधानकारक नसल्याचे तिच्या लक्षात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांची कामगिरी तपासण्यासाठी ती दुसरी चाचणी तयार करते आणि परीक्षा घेते. अशा चाचणीला काय म्हणतायेते ?

(1) संस्कारक्षम चाचणी (Formative Test)

(2) समग्र चाचणी (Summative Test)

(3) उपचारात्मक चाचणी (Diagnostic Test)

(4) एकत्रित चाचणी (Cumulative Test)

**114.** भाषा शिक्षिका वर्गात शिकवल्यानंतर आपल्या नोंदवहीत “भाषेशी संबंधित खेळ मुलांना खूप आवडला आणि त्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. मात्र तिसऱ्या फळीतील मुलांना अपेक्षित गोष्टी साध्य करण्यात अडचण आली.” नोंदवहीतील तिची नोंद म्हणजे....

(1) आकलन (assessment)

(2) प्रासंगिक नोंद (anecdotal record)

(3) विमर्शी विचार (reflective thinking)

(4) निरीक्षण (observation)

**115.** एक प्रभावी भाषा शिक्षक ......

(1) पाठ्यपुस्तकातील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर विद्यार्थ्यांकडून पाठ करून घेतील.

(2) पाठ्यपुस्तकाचा तर वापर करतीलच शिवाय त्या पलिकडच्या गोष्टींचाही विचार करतील.

(3) पाठ्यपुस्तकाच्या आधारेच प्रश्न पत्रिका तयार करतील.

(4) पाठ्यपुस्तकापलिकडचा विचारही करणार नाही.

Prepp Your Personal Exams Guide

www.prepp.in



**116.** भाषा अध्ययनात पुढीलपैकी कोणती बाब सर्वात महत्वपूर्ण ठरते ?

(1) पाठ्यपुस्तक

(2) पूरक वाचन

(3) बाल साहित्य

(4) कृती पत्रक

**117.** पुढीलपैकी कोणत्या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वेग मिळू शकेल ?

(1) परीक्षेत चांगले गुण मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन

(2) आपल्या अनुभवांच्या आधारे मुक्तपणे लेखन करण्यास संधी देणे.

(3) विद्यार्थ्यांना मूल्य आधारित कथा लिहिण्या–वाचण्यास सांगणे.

(4) विद्यार्थ्यांना अभ्यासात आवड निर्माण करण्यास सांगणे.

**118.** भाषेत माईंड मॅपिंग (Mind Mapping) म्हणजे काय ?

(1) मेंदूचे चित्र रेखाटणे

(2) कथा/कवितेच्या आशयावर आधारित चित्र रेखाटणे

(3) विद्यार्थ्यांना साहसिक उपक्रमाचा आराखडा तयार करुन सादर करावयास सांगणे

(4) विद्यार्थ्यांना नवीन कल्पना साकार करण्यास आणि सहसंबंध जुळवण्यास सांगणे.

**119.** लेखन कौशल्याचा विकास करण्यात पुढीलपैकी कोणती बाब सर्वात महत्वपूर्ण आहे ?

(1) चांगल्या अक्षरात लेखन

(2) योग्य वर्णक्रम (spelling)

(3) निर्दिष्ट विषयावर दिलेल्या सूचनांच्या आधारे लेखन

(4) स्वत:चा दृष्टिकोन, विचार आणि अनुभव लेखनात उतरवणे

**120.** विरंगुळा मिळण्यासाठी आणि सामान्य वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी ‘खास विद्यार्थ्यांसाठीच्या पाठात’ काय अनुस्यूत असते ?

(1) सखोल वाचन

(2) व्यापक वाचन

(3) पूर्व वाचन

(4) पश्चात् वाचन

www.prepp.in



Prepp
Your Personal Exams Guide

परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150),** if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

www.prepp.in



भाग – V
भाषा – II
मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **(प्रश्न क्र. 121 ते 150)** यांची उत्तरे द्यावीत.

**पुढील उतारा वाचा आणि प्र. क. 121 ते 128 यासाठी योग्य पर्याय निवडा.**

नुकताच आपण एकविसाव्या शतकाच्या प्रथम चरणात प्रवेश केला आहे. यासाठी लागणारी भौतिक आणि मानसिक तयारी जगातले अनेक प्रगत देश जोमाने करीत आहेत. तितक्याच वेगाने करीत आहेत. कारण या नव्या शतकाच्या प्रगतीच्या वेगाबरोबर जो समाज आणि जे राष्ट्र जाणार नाही; त्याचे अस्तित्व धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे म्हणण्याचे कारण असे की, हे नवे शतक विलक्षण क्रांतिकारी, कमालीचे गतिमान अन् तितकेच विज्ञान प्रगतीने चकित करून सोडणारे होणार आहे. आतापर्यंतच्या सर्व शतकांतले ते वेगळे शतक ठरेल. विज्ञानाची प्रगती, तंत्रज्ञानाची झेप, नव्या संशोधनाचा आवाका अन् त्यातून लाभणारे भौतिक सुखविलास याची आपण पुरेशी कल्पनाही करू शकणार नाही. माणसाच्या हातापायांशी भौतिक सुख साधनांची इतकी रेलचेल होणार आहे की; त्याला कसलेही श्रम करावे लागणार नाहीत. शरीरश्रमाला सुट्टी तर मिळेलच; पण बौद्धिक श्रमदेखील प्रगत तंत्रज्ञानामुळे करावे लागणार नाहीत. त्याला फक्त श्वासोच्छ्वास घेण्यासाठी श्रम करावे लागतील. किंबहुना त्याच्यासाठी सुद्धा फुफ्फुसाला चार–सहा दिवसांच्या रजेवर पाठवून पर्यायी शर्टाच्या खिशामध्ये ठेवण्याची सोय निर्माण केली जाईल. पर्याय म्हणून कृत्रिम फुफ्फुस किंवा हृदय निर्माण करण्यावर भर देत असतानाच कृत्रिम माणूस देखील तयार होऊ शकेल. या मानवाला आपणाला हवा असणारा रंग देता येईल. हवी असलेली उंची निर्माण करता येईल. हवे असलेले नैपुण्य उत्पन्न करता येईल. त्याच्यातले दोष निपटून काढता येतील. त्याला कोणत्याही रोगाचा त्रास होणार नाही याची काळजी घेता येईल व सामाजिक व राष्ट्रीय गरजांच्या पूर्ततेचा विचार करून तशा गुणांनी युक्त असलेली पिढी तयार करता येईल. तीही ऑर्डरप्रमाणे : म्हणजे एखाद्या देशाला चार लाख सैनिकांची गरज असेल तर उंच, तगडे, बळकट, शक्तिशाली, युद्धनिपुण आणि सैनिकांसाठी आवश्यक असलेल्या साऱ्या गुणांनी युक्त असे तरुण राष्ट्राच्या गरजेप्रमाणे निर्माण केले जातील. म्हणून हे शतक चक्रावून सोडणारे शतक ठरल्याशिवाय राहणार नाही. या शतकात माणसाची मशीन होईल, त्याला हवी तशी प्रजा होईल, दुष्काळ, रोगराई, पूर, साथीचे रोग, भूकंप, उपासमार, यांचा मानवजातीला उपद्रव होणार नाही. कारण यांचे उच्चाटन एकविसाव्या शतकाने केव्हाच करून

www.prepp.in



टाकलेले असणार. एवढेच काय, पिण्याचे पाणी मिळत नाही; अन्न-वस्त्र मिळत नाही, अशी तक्रारच उरणार नाही. कारण भरपूर पिके देणारे नवनवीन अन्न-धान्याचे वाण तर तयार होतीलच, पण कदाचित उद्या हवेतून अन् सागराच्या पाण्यापासून मानवाला लागणाऱ्या अन्नाची निर्मिती केली जाईल. आजच खऱ्या मातीला पर्याय म्हणून कृत्रिम रासायनिक माती तयार झाली आहे; उद्या ती संपूर्ण जगात निर्माण होऊ शकेल. मग अन्नधान्यासाठी जमीन कशाला हवी ? तिची गरजच असणार नाही.

**121. नव्या शतकाच्या संदर्भात केलेल्या विधानांपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?**

(1) हे शतक विलक्षण क्रांतिकारी आहे.

(2) हे शतक कमालीचे गतिमान आहे.

(3) या शतकात भौतिक सुखसाधनांची उपलब्धता असेल

(4) तंत्रज्ञानामुळे बौद्धिक श्रम करावे लागतील

**122. 'निपुण' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.**

(1) वाकबगार

(2) निपचित

(3) निमग्न

(4) वाजवी

**123. एकविसाव्या शतकाचे कोणते वैशिष्ट्य लेखकाने अधोरेखित केले आहे ?**

(1) चक्रावून टाकणारे

(2) निरुपद्रवी नसणारे

(3) अवगुणयुक्त पिढी तयार करणारे

(4) स्थितीशील असणारे

**124. वर्तमान काळात लेखकाला कोणाचे अस्तित्त्व धोक्यात असण्याची भिती वाटते ?**

(1) काळाची पाऊले न ओळखणाऱ्या देशांचे

(2) अन्न धान्याचे

(3) भूक आणि उपासमारीचे

(4) सैनिकांचे

**125. भविष्यकाळात काय-काय होऊ शकेल या बाबत लेखकाने काय सांगितले नाही ?**

(1) पाण्यातून अन्नाची निर्मिती

(2) अन्नधान्यांचे वाण

(3) शरीरश्रमाला सुट्टी मिळणार नाही

(4) गरजे प्रमाणे तरुण निर्माण केले जातील

www.prepp.in



**126.** ‘कल्पनाही न करता येणारे’ या वाक्यासाठी एक पर्याय सुचवा.

(1) कल्पकता

(2) कल्पनातीत

(3) कलात्मकता

(4) कला रसिकता

**127.** लेखकाच्यामते एकविसाव्या शतकात काय होणार नाही ?

(1) श्वासोच्छवासासाठी श्रम करावे लागणार नाही

(2) कृत्रिम फुफ्फुस किंवा हृदय तयार होईल

(3) भौतिक विलासाची आपण कल्पना करु शकणार नाही

(4) कृत्रिम माणूस तयार करता येईल

**128.** ‘रेलचेल’ या शब्दातून लेखकाला काय सुचवायचे आहे ?

(1) सांधनांची अत्यधिक उपलब्धता

(2) भौतिक सुखविलास

(3) कमालीची गतिमानता

(4) तंत्रज्ञानाची झेप

**पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 यासाठी योग्य पर्याय निवडा.**

आज सत्तरीत किंवा त्यापेक्षा वयस्कर असलेल्या मुंबईकरांना शहरात फिरणारी ट्राम आठवली की गलबलून येतं. त्यांच्या आठवणीत येते ३१ मार्च १९६४ ची ती रात्र. त्याच रात्री शेवटची रपेट मारून मुंबईची ट्राम अंतर्ध्यान पावली. मुंबईच्या आधुनिकीकरणात आणि मुंबईला या देशाची आर्थिक राजधानी बनवण्यात ट्रामनं मोठं योगदान दिलं. मुंबईच्या विकासात मुंबईच्या ट्रामचा समावेश आवर्जून करावा लागेल.

या ट्रामचा प्रवास करण्याची मौज आगळीच असायची. मुंबईला प्रथम भेट देणारे मुद्दाम ट्राममधून फिरत असत. मात्र अखेर या ट्रामला निरोप देण्याचा कटू निर्णय घ्यावाच लागला. आधुनिक काळ–काम–वेग यांना साजेशी नसणारी ट्रामसेवा विसर्जन करण्याचा निर्णय मुंबई महापालिका आणि ट्राम चालवणाऱ्या ‘बेस्ट’ उपक्रम यांनी घेतला. ट्रामला कायमचा निरोप देण्यापूर्वी बऱ्याच आधी तिला पर्याय शोधण्याचे प्रयत्न सुरु झाले होते. त्यातला एक पर्याय होता विमानतळ, समुद्रकिनारे, मैदाने, बागा आणि रेल्वेस्थानकं यांना जोडणारं एक जाळं निर्माण करण्याचा. हा प्रस्ताव घेऊन बेस्ट अधिकाऱ्यांच्या एका पथकाला जपानला पाठवण्यात आलं होतं. दक्षिण मुंबईत मोनो रेल यंत्रणा उभी करावी, अशी शिफारस या पथकानं परत आल्यावर केली होती. मात्र आपल्या रिवाजाप्रमाणे ती शिफारस कुठे गायब झाली ते कळलंच नाही.

www.prepp.in



मुंबईच्या ट्रामचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. मुंबईकरांची अविरत ७५ वर्षे सेवा करणाऱ्या ट्राम यंत्रणेची निर्मिती १८७४ च्या बॉम्बे ट्रामवेज ॲक्ट या कायद्यानुसार झाली. गंमत म्हणजे याच कायद्याचा वापर करून सध्याची मोनो आणि मेट्रो यंत्रणा उभारली जात आहे. इंग्रजांनी लंडनच्या धर्तीवर मुंबईचा विकास सुरु केला. शहरातील सार्वजनिक वाहतुकीसाठी ट्रामचा पर्याय निवडण्यात आला. मुंबईत भारतातली पहिली ट्राम सेवा सुरु झाली. सर्वप्रथम मुंबईत घोड्यांच्या ट्राम असत. त्यांना थांबे नसत. लोक हात दाखवून ट्राम थांबवत. परळ इथं या घोड्यांसाठी मोठी पाणपोई बांधलेली होती. परळ पोयबावडी म्हणून ती आजही प्रसिद्ध आहे. गिरगावचा सरकारी तबेला (क्रांतिनगर), चर्नीरोडचा स्टॉपचा तबेला (ताराबाग) आदि ठिकाणी या घोड्यांच्या पागा होत्या. विजेवर चालणारी ट्राम मुंबईत १९०७ साली धावू लागली. या विद्युतीकरण सेवेचा शुभारंभ ७ मे १९०७ रोजी नगराध्यक्ष वल्लभदास ठाकरसी यांनी सायंकाळी साडेसहा वाजता महानगरपालिकेच्या मुख्यालयासमोर केला. यासाठी खास सजवण्यात आलेली ट्राम क्रॉफर्ड मार्केटपर्यंत गेली आणि परत आली. आता ट्राम विजेवर चालत असल्यामुळे साहजिकच तिचा वेग वाढला. तिची अंतर्बाह्य सजावटही सुखकारक होती आणि भाडंही माफक होतं. ही सेवा नंतर ग्रँटरोड आणि अखेर दादर खोदादाद सर्कलपर्यंत (ट्राम टर्मिनस म्हणजेच टी.टी.) वाढवण्यात आली.

**129. घोड्यांसाठी पाणी पिण्याची सोय कुठं करण्यात आली होती ?**

(1) परळ

(2) चर्नी रोड

(3) दादर

(4) क्रॉफर्ड मार्केट

**130. 'यंत्रणा' शब्दाचा आशय व्यक्त होत नसलेला पर्याय शोधा.**

(1) काम करण्याची व्यवस्था

(2) कार्यपद्धती

(3) कार्यक्षमता

(4) काम करण्याची साधने

**131. लेखकाच्या मते ट्राममधून आवर्जून प्रवास कोण करीत असे ?**

(1) मुंबईकर

(2) प्रवासी

(3) वल्लभदास ठाकरसी

(4) बेस्टचे अधिकारी

**132. ट्रामने किती काळ मुंबईची सेवा केली ?**

(1) साडेपाच दशक

(2) साडेसहा दशक

(3) साडेसात दशक

(4) साडेआठ दशक

www.prepp.in



prepp Your Personal Exams Guide

**133.** पुढील पर्यायातील विशेषनाम शोधा.

(1) मैदान

(2) बाग

(3) मुंबई

(4) शहर

**134.** मुंबईची ट्राम कधी बंद झाली ?

(1) 1907

(2) 1874

(3) 1964

(4) 1864

**135.** कोणत्या कारणास्तव ट्राम सेवा बंद करण्याचा निर्णय झाला ?

(1) काळ–काम–वेग याला प्रतिकूल असल्याने

(2) विजेचा खर्च वाढल्यामुळे

(3) लोकांना तिचा कंटाळा आल्यामुळे

(4) वाहतुकीत अडथळा येत असल्याने

(योग्य पर्यायाची निवड करून उत्तरे द्या प्र.क्र. 136 ते 150)

**136.** वृत्तांत लेखन करताना पुढीलपैकी कोणत्या कृतीचे अनुकरण केले पाहिजे ?

(1) शब्द मर्यादा

(2) अलंकारिक भाषेचा वापर

(3) संबंधदर्शक सर्वनामाचा वापर

(4) विचारांची सुसूत्रता

**137.** भाषा ही ______ नसून ______ आहे.

(1) उत्पाद, प्रक्रिया

(2) प्रक्रिया, उत्पाद

(3) लेखनसराव, प्रक्रिया

(4) प्रक्रिया, लेखन सराव

**138.** विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्याचे मूल्यमापन करताना शिक्षकांनी कोणत्या गोष्टीवर सर्वात जास्त भर द्यावा ?

(1) अलंकारिक भाषेचा वापर

(2) योग्य वर्णक्रम

(3) व्याकरणदृष्ट्या योग्य रचना

(4) विचारांचे सादरीकरण

**139.** वाचनपूर्व कृती केली जाते.....

(1) अवघड शब्दांच्या अर्थ सांगण्यासाठी

(2) पाठातील व्याकरणिक नियम/मुद्दे समजविण्यासाठी

(3) विद्यार्थ्यांच्या वाचन क्षमतेचे मूल्यमापन करण्यासाठी

(4) विद्यार्थ्यांचे पाठाशी संबंधित पूर्वज्ञान जागृत करुन त्या आधारे विद्यार्थ्यांची तयारी करुन घेणे.

prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in



Prepp
Your Personal Exams Guide

**140.** राज्य घटनेच्या ८व्या अनुसूचीत किती भाषांचा उल्लेख केला गेला आहे ?

(1) 16

(2) 20

(3) 22

(4) 24

**141.** शिक्षिका आपल्या वर्गात नेमकी सूचना देते आणि विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या परिस्थितीतल्या भूमिका करण्यास सांगते. त्यानंतर त्यांच्या भूमिकांशी संबंधित काही नियम निवडून त्यांचा सराव करुन घेते. शिक्षिका पुढीलपैकी कोणती गोष्ट शिकवते ?

(1) उपचारात्मक व्याकरण

(2) स्वायत्त व्याकरण

(3) ससंदर्भ व्याकरण

(4) निगमन पद्धती

**142.** एक भाषा शिक्षिका प्रत्येक मुलाच्या शिकण्याच्या शैली विचारात घेऊन त्यांच्या गरजा पूर्ण करु शकते जर…

(1) प्रत्येक शब्द त्याच्या अर्थासकट शिकवते आणि पाठाचे पुनरावलोकन करते.

(2) विद्यार्थ्यांचे नियमित मूल्यमापन करते.

(3) अभ्यासाव्यतिरिक विद्यार्थ्यांना नृत्य/संगीत/खेळ आणि चित्रकलेत सहभाग घेण्यास प्रवृत्त करते.

(4) वेगवेगळ्या विद्यार्थ्यांच्या गरजा भागविण्यासाठी वेगवेगळ्या शैक्षणिक पद्धती व योजनांचा वापर करुन मूल्यमापनाची आखणी करते.

**143.** “भाषा अध्ययनात सामाजिक संपर्काची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते.” हे विधान कोणी मांडले ?

(1) चॉम्स्की (Chomsky)

(2) पीगेट (Piaget)

(3) व्यगोत्स्की (Vygotsky)

(4) स्किनर (Skinner)

**144.** संभाषण कौशल्यात कोणती बाब महत्त्वाची ठरते ?

(1) स्पष्ट आणि योग्य उच्चारण

(2) मसुदा आणि परिस्थितीप्रमाणे बोलणे

(3) मृदु संभाषण

(4) अलंकारिक भाषा

**145.** विद्यार्थ्यांची भाषा अध्ययनातील समस्या समजून घेण्यासाठी पुढीलपैकी कोणती चाचणी शिक्षकाला उपयोगी ठरते ?

(1) खंडित चाचणी (Discrete Point Test)

(2) उपचारात्मक चाचणी (Diagnostic Test)

(3) संभाषणात्मक चाचणी (Communicative Test)

(4) समस्या सोडवण्यासाठी घेतलेली चाचणी (Problem Solving Test)

www.prepp.in



**146. पोर्टफोलियो (Portfolio) च्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान अचूक आहे ?**

(1) यामुळे लेखनाची सवय लागते

(2) याचे मुख्य उद्दिष्ट मुलांच्या कामाचे जतन करणे आणि त्याला सुरक्षित ठेवणे आहे.

(3) यामुळे विद्यार्थी व्यस्त राहतात आणि शिक्षकांचा वेळ वाचतो

(4) यामुळे शिक्षकाला विद्यार्थ्यांची उत्तरोत्तर प्रगती समजून घेण्यास मदत होते.

**147. स्वरशैलीत विविधता कशामुळे येते ?**

(1) अवयव

(2) ध्वनी

(3) हवा

(4) श्रुती

**148. 'वाणी' घरात फारसे बोलत नाही, मात्र शाळेत खूप बोलते. हे काय सुचवते ?**

(1) तिला तिचे घर अजिबात आवडत नाही.

(2) तिच्या विचारांची शाळेत योग्य दखल घेतली जाते.

(3) शाळा मुलांना बोलण्यासाठी संधी देते.

(4) वर्गीतील शिस्तीकडे शिक्षक फारसे लक्ष देत नाही.

**149. भाषिक कौशल्यात पुढीलपैकी कोणत्या दोन घटकांचा समावेश होतो ?**

(1) योग्य उच्चारण आणि सखोल वाचन

(2) प्रतिलेखन आणि सुंदर अक्षर

(3) अचूकता आणि ओघ

(4) चाळून पाहणे आणि न्याहाळणे

**150. भाषा अध्ययन सोपे होईल जर....**

(1) पाठ्यपुस्तके शिकवली नाहीत.

(2) परीक्षा नसतील.

(3) भाषासमृद्ध वातावरण असेल.

(4) लेखन करण्यापूर्वी व्याकरणाच्या सरावावर, अभ्यासावर अधिक वेळ दिला.

www.prepp.in



## SPACE FOR ROUGH WORK

Prepp
Your Personal Exams Guide

www.prepp.in



**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.
2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या बाजू-2 वर केवळ एकच वर्तुळ निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर वे बदलता येणार नाही.
3. परीक्षार्थींनी उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
5. चाचणी-पुस्तिका/उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.
7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.
9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/विची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.
11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
14. चाचणी-पुस्तिका अथवा उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

www.prepp.in



**निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :**

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें ।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **काले/नीले बॉल पॉइन्ट पेन** से भरें । एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है ।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ । परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें ।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी ।
5. परीक्षा पुस्तिका / उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाज़िरी-पत्र में लिखें ।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी । इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए ।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है ।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्वीच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए । इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और उनके विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित ।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें ।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर पत्र दिए बिना एवं हाज़िरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे । यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाज़िरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा । **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान हाज़िरी-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ ।**
12. इलेक्ट्रॉनिक / हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है ।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं । अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा ।
14. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें ।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल / कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर पत्र कक्ष-निरीक्षक को अवश्य सौंप दें । परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं ।**

**READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY:**

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Black/Blue Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet / Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/ room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/ rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against them including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his / her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his / her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/ Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic / Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***